Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

April -2021

ISSUE No- (CCLXXI)290

## India's Challenges in 21st Century: Issues and Remedies




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
Dr Nitin A. Mathankar
Principal
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

**Guest Editor**
Adv. Nitin V. Kolhatkar
President
Swami Vivekanand Bahuuddeshiya
Vikas Shikshan Sanstha, Rohana.

B.Aadhar

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with OKEN Scanner

# INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | स्वच्छ भारत अभियान : यश आणि अपयश | डॉ. संदीप बी. काळे | 1 |
| 2 | कोरोना महामारी – लसीकरणाची खरी गरज | डॉ. संजय गोरे | 5 |
| 3 | रवींद्र शोभणे यांच्या प्रतीक कथा | प्रा. काशीनाथ वि. तरासे | 8 |
| 4 | बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांचे बहुजनांच्या उत्थानात योगदान | डॉ. रूपेश मेश्राम | 14 |
| 5 | भारतीय अर्थव्यवस्थेतील वर्तमान आर्थिक स्थित्यंतरे : एक दृष्टीक्षेप | प्रा.डॉ. रवींद्र बापुराव शेंडे | 21 |
| 6 | स्वयंपूर्ण ग्रामजीवनाचे तंत्र आणि मंत्र शिकविणारे क्रांतीपुरूष : तुकडोजी महाराज | प्रा.महेंद्र द. झलके | 27 |
| 7 | विकासामुळे पर्यावरणाचे संरक्षण – एक मोठी समस्या | प्रा. डॉ. ममता आर साहू | 31 |
| 8 | भारताचे शैक्षणिक धोरण आणि ग्रमीण विकास | अमित नानाभाऊ कुटे | 35 |
| 9 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या– एक गंभिर प्रश्न | प्रा.डॉ. लोमेश्वर रामचंद्र घागरे | 39 |
| 10 | भारतीय कृषी व्यवस्था व चळवळी – एक ऐतहासिक दृष्टीकोन | Dr.Prakash Pawar | 42 |
| 11 | भारतातील सेंद्रिय शेती : समस्या आणि आव्हाने | प्रा. डॉ. सर्जेराव गंगाधर गोल्डे | 46 |
| 12 | भारतीय संसदीय समित्या व त्यांची कार्यध्दती | प्रा.अतुल नारायण खोटे | 51 |
| 13 | पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरकालीन राजवाडे : एक ऐतिहासिक सिंहावलोकन | प्रा. डॉ. तिर्थनंद रा. बन्नगरे | 56 |
| 14 | भारतातील अंतर्गत दहशतवाद : स्वरुप व उपाययोजना | प्रा. डॉ. नितीन दादाराव गौरखेडे | 58 |
| 15 | २१ व्या शतकातील भारतासमोरील आव्हान – दहशतवाद | प्रा. विनोद म. पुनवटकर | 60 |
| 16 | २१ व्या शतकातील ग्रंथालयासमोरील आव्हाने, समस्या आणि उपाययोजना | प्रा. डॉ. पल्लवी साहेबराव काळे | 65 |
| 17 | अनुदानित माध्यमिक शाळेतील विद्यार्थी–पालक सहभागाचा त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास. | चोपराम लक्ष्मण गडपायले / डॉ.अमोल मांडेकर | 69 |




Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) -7.675,Issue NO, 290 (CCXC) A
ISSN : 2278-9308
April , 2021

# भारतीय अर्थव्यवस्थेतील वर्तमान आर्थिक स्थिस्थंतरे : एक दृष्टीक्षेप

प्रा.डॉ. रवींद्र बापुराव शेंडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख लोकमान्य महाविद्यालय, वरोरा जि. चंद्रपूर (महा.), पिन. ४४२९०७

**गोषवारा (Abtract)**

भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक क्षमता आणि मर्यादा वर्तमान दशकामध्ये वाढल्या असतांना मर्यादा दुर करण्यासाठी शास्त्रज्ञानाचा प्रत्येकाकडून प्रचंड वापर होणे अतिआवश्यक आहे. जागतिक नवप्रवर्तन निर्देशांकातील (१) संस्था (२) मानव संसाधन व संशोधन (३) पायाभूत सेवा–सुविधा (४) बाजार सुविधा (५) व्यावसायीक सुधारणा या पाच घटकावर भर देण्याबरोबरच "आत्मनिर्भर भारत" या संकल्पनेचे सार्वत्रिकरण होणे आवश्यक आहे. कोवीड–१९ चा प्रभाव खरोखर प्रचंड संधी आणि आव्हानाने भरला असल्यामुळे समाजाभिमुख नवप्रर्वतनावर खुप–खुप भर देणे पुढिल प्रत्येक दशकात आवश्यक आहे.

**प्रस्तावना:**

भारताला २०११ च्या जनगणनेतुन कार्यकारी लोकसंख्येचा मोठा आकडा (७२.३८%) वर्तमान दशकामध्ये (२०१०–२०२०) मिळाला आहे. देशाला कार्यकारी लोकसंख्येचा फायदा मिळत जात असतांना कोविड–१९ च्या प्रभावामुळे प्रचंड नुकसान सहन करावे लागत आहे, तर दुसऱ्या बाजुला आपल्या देशाच्या संस्कृतीची खास ओळख इतर देशांना होत आहे. कारण कोवीडमध्ये संयम, शांतता, सहकार्य, मदत, संशोधन चिकित्सा अशा विविध वैशीष्ट्यामुळे जनजीवन चांगले राहण्यास मदत झाली आहे. हेच आपल्या संस्कृतीचे चांगले वैशिष्ट्ये जगाला अनुभवास आले आहे.

वर्तमान सरकारमध्ये पुर्व सरकारने उपलब्ध करून दिलेल्या उपलब्धता कौशयल्याने वापर करण्याची क्षमता तसेच नवीन उपलब्धता (समाजाउपयोगी) उपलब्ध करण्याची प्रचंड क्षमता असल्यामुळे वर्तमान दशकातील आर्थिक अस्थिरता सांभाळणे किंवा त्यातील तीव्रता कमी करणे शक्य झालेले पहावयास मिळते. वर्तमान दशकामध्ये (२०१०–२०२०) स्वच्छ भारत अभियान, २०११ ची जनगणना, नवीन सरकारची दोनदा आगमने, जनधन योजना, नोटाबंदी, वस्तू आणि सेवा करप्रणाली, नीती आयोग, एन.आर.सी., केंद्र व घटक राज्य संख्येतील बदल, पंचवार्षिक योजनेएवजी कृती कार्यक्रम, कमजोर विरोधीपक्ष, ३७० वे कलम, नवीन शैक्षणिक धोरण, एक स्तर – एक पेंशन, बॅकांचे विलिनीकरण व राष्ट्रीयीकृत बॅकांची संख्या, रोखमुक्त व्यवहारासाठी डिजीटललाईझेन, सातवा वेतन आयोग, पुलवामा हल्ला आणि प्रतिउत्तरे, घटकराज्यांच्या मर्यादा, क्षमता आणि संधीत वाढ, कोवीड–१९ आणि लॉकडाऊन, अनलॉकडाऊन, कृषी विधेयक, विविध अक्षपूर्ती व क्षतपूर्ती हानी, मानव विकास निर्देशांक अशा अनेक घटनांनी वर्तमान दशक पूढे गेले आहे. कोवीड–१९ मुळे तर अक्षतपूर्ती हानीचा भाग वाढला आहे. हेच या दशकाचे मोठे वैशीष्ट्य ठरले आहे.

बदल ही नैसर्गिक घटना असली तरी २१ व्या शतकाच्या वर्तमान दशकातील (२०१०–२०२०) पिढिने आर्थिक, राजकिय, सांस्कृतिक, नैतिक अशा सर्व घटकात मोठा बदल पहालेला आहे. आत्मनिर्भरता, शाश्वत विकास, सर्वसमावेशक विकास, सार्वभौमत्वातील अखंडता, लोकशाही याचा भक्कम पाया या दशकात विकसीत करण्यास संधी मिळाली आहे.

**बीज शब्द**

अक्षतीपूर्ती हानी, अजागतिकीकरण, कोवीड–१९, अनलॉकडाऊन, लॉकडाऊन

**संशोधन पध्दती –**

प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम सामुग्रीवर आधारित आहे. दुय्यम सामुग्रीतील इंटरनेट, पुस्तके, शोधनिबंध, शोधप्रबंध, त्रैमासीके अशा निवडक साधनांचा वापर करण्यात आला आहे. तसेच वर्णणात्मक व विश्लेषणात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात आला आहे.



Scanned with OKEN Scanner

**निवडक संशोधन साहित्याचा आढावा**

चंद्रशेखर राव के (२०१७) यांचे मते आपल्या समाजाची मुळे ज्या समाजात रुजली आहे तेथून विकासाला प्रारंभ होणे किंवा त्या क्षेत्राकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.स्कॉट मॉरिसनऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान यांचे मते मुक्त व्यापार हा समृध्दीचा मार्ग आहे परंतु आपण आपले आर्थिक सार्वभौमत्व जपले पाहिजे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

सदर संशोधनाचा उद्देश खालिलप्रमाणे आहे.

१) अ–जागतिकरणाचे दशक म्हणून वर्तमान दशकाचा अभ्यास करणे.

२) वर्तमान दशकातील (२०१०–२०२०) कोवीड–१९ चा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणामाचा अभ्यास करणे.

३) २१ व्या शतकाच्या दुसऱ्या दशकातील आर्थिक घटकांचा अभ्यास करणे.

४) वर्तमान दशकातील (२०१०–२०२०) कार्यकारी लोकसंख्येचा (७२.३८%) अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीते**

१) कोवीडमुळे वर्तमान दशकातील (२०१०–२०२०) २०२०–२०२१ हे आर्थिक वर्ष विकासाला अत्यंत प्रतिकूल परिणाम करणारे ठरले आहे.

**विषयाचे विश्लेषण**

अ–जागतिकीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेची पुर्नरचना करून स्थानिक व राष्ट्रीय अर्थव्यवस्था दृढ व सक्षम करणे होय. (प्रा. वाल्दन बेल्लो, फिलीफाईन्स) जागतिकीकरणाचे प्रचंड फायदे असले तरी सर्व आणिबाणीच्या काळात स्थानिक व राष्ट्रीय क्षमतांच्या विस्तारासाठी अ–जागतिकरण आवश्यक आहे. कोवीड–१९ मार्फत याची चांगली ओळख प्रत्येक देशाला आलेली आहे व अजागतिकरणाची मुळे वर्तमान दशकात मोठ्या प्रमाणात विस्तारीत जात असलेली पहायला मिळते. आत्मनिर्भर भारत हे अजागतिकरणाचे चांगले उदाहरण आहे. तसेच अमेरिकेत अमेरिका फर्स्ट ही योजना अ–जागतिकरणाचे चांगले उदाहरण आहे. एकाच नाण्याच्या दोन बाजू या नात्याने अजागतिकीकरण व जागतिकीकरणाचा प्रवाह निर्माण होणे अतिआवश्यक आहे.

**अजागतिकीकरणाला प्रेरित करणारे दशक**

जगाच्या पाठिवर जेवढे देश आहे त्याची विभागणी विकसीत व विकसनशील अशा दोन गटात सहज करता येते. प्रत्येक व्यक्तीकडे दुसऱ्यांना देण्यासारखे प्रचंड असते व घेण्यासाठी बरेच असते या दुष्टीकोनामे जागतिकरणाचा प्रवाह तुलनात्मक लाभ–हानीचा प्रवाह १९९०–१९९१ नंतर मोठा प्रवाहित झाला. त्याचा लाभही प्रत्येक देशांनी आपल्या–आपल्या सोईने उचलला परंतु पुढे–पुढे मर्यादा प्रचंड वाढत जात असल्यामुळे विकसीत व विकसनशील देश अजागतिकीकरणाचा किंवा संरक्षण नितीचा अधिक वापर करतांना दिसत आहे. त्याचे कारण बघीतल्यास निदर्शनास येते की समग्र आणिबाणीच्या वेळी आणि वर्तमान प्रसंगात ज्या देशाच्या समस्या त्या त्या देशाला स्वतःच काळजीपुर्वक हाताळाव्या लागतात. कोवीड–१९ मुळे तर संरक्षण नीतीची मोठी ओळख झाली आहे.

"कोणताही देश, एका देशाला पूर्ण वेळेपर्यंत मुर्ख बनवू शकतो. सर्व देशांना काही वेळापुरता मुर्ख बनवू शकतो परंतु एक देश सर्व देशांना पुर्ण वेळ मुर्ख बनवू शकत नाही". त्यामुळे जागतिकीकरणाचा प्रवाह हा अखंड काळापर्यंत सुरू असला तरी त्याला अ–जागतिकरणाची जोड देणे आवश्यक आहे. प्रसंगी त्यातुन बाहेर पडणेही अत्यावश्यक आहे.

अ–जागतिकीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेची पुर्नरचना करून स्थानिक व राष्ट्रीय अर्थव्यवस्था अधिक सुदृढ व सक्षम करणे होय. वर्तमान दशकामध्ये आत्मनिर्भर भारत, मेक इन इंडिया, एक देश – एक बाजारपेठ, ३७० व्या कलमाचे नष्टता, एन. आर. सी. ची प्रक्रिया, मुळ प्राचीन संस्थांची जोपासना व विस्तारीकरण अशा एक ना अनेक घटनाद्वारे स्वदेशी चळवळ जीवंत ठरत असलेले पहायला मिळत आहे. कोवीड–१९ मुळे सुध्दा अजागतिकरणाला प्रेरक तत्व मिळाले आहे. मोठ्या देशांच्या क्षमतांचा वापर त्यांना स्वताच करावा लागला त्यामुळे विकसनशील देश स्वताच्या क्षमता स्वतःच विस्तारीत करीत आहे. जागतिकीकरण म्हणजे शस्त्रज्ञान होय,तर अजागतीकीकरण शास्त्रज्ञान आहे आणि वर्तमान दशकामध्ये मोठ्या उपलब्धतता अजागतिकीकरणाने तयार केल्या आहे, एकुणच वर्तमान दशक हे अजागतिकरणाचे प्रेरकतत्व ठरले आहे.



Scanned with OKEN Scanner

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675,Issue NO, 290 (CCXC) A
ISSN : 2278-9308
April , 2021

कोवीड–१९ आणि भारतीय अर्थव्यवस्था

२०२०–२०२१ हे आर्थिक वर्ष भारतासाठी व जगाच्या पाठिवरील प्रत्येक देशासाठी मोठे संकटाचे ठरले आहे. असंख्य क्षमतांनी युक्त प्रत्येक देश असतांना आरोग्य आणिबाणीच्या क्षेत्रात देशाला वाचविणे प्रत्येक देशाला कठिण झाले होते. टाळबंदीसारखे तात्पूरते उपाय वापरून प्रतिकूल परिणामांची तिव्रता कमी केलेली पहायला मिळते. सत्तेवरील राजकीय पक्षाला, कारखानदाराला, कुटूंबप्रमुखाला, मजुराला, धोरणांची आखणी करणाऱ्यांना, आंतरराष्ट्रीय संघटनांना कोवीड–१९ चे समुळ नष्ट करणे फारसे सुचले नाहीत. आरोग्यात बिघाड निर्माण झाल्यास घरची बचत पूर्ण संपते व दैनंदिन खर्चावर ताण पडतो अगदी त्याचप्रमाणे राष्ट्रांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागला आहे. वर्तमान दशकाच्या सुरवातीपासूनच आर्थिक स्थित्यंतर व पुन्हा कोरोना संकटामुळे महाआर्थिक स्थित्यंतर निर्माण झाले असल्यामुळे आर्थिक विकासांचा प्रवाह शून्याच्या जवळपास स्थिरावलेला पाहायला मिळतो आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतेतील मुख्य क्षेत्रावरील परिणाम पुढिलप्रमाणे.

(१) उद्योग क्षेत्र

उद्योग क्षेत्रात पुरवठ्यावर नियंत्रण प्रस्थापित करणे शक्य असले तरी पुरवठा ताबडतोब शून्य करता येत नाही. त्यामुळे कोवीड–१९ चा उद्योगावर प्रचंड प्रतिकूल परिणाम झाला आहे. देशाच्या उद्योग क्षेत्राचा वृध्दीदर टाळेबंदीपूर्वी जानेवारी २०२० मध्ये २.१% होता तो जुलैमध्ये– १८.३% राहिला आहे. कोळसा, क्रुड तेल, नैसर्गिक वायु, रिफायनरी वस्तू, सिमेंट उत्पादन, वीज उत्पादन, खते उत्पादने इत्यादी उत्पादन घटले. किरकोळ उद्योग तर पुर्ण नष्ट झालेले पहायला मिळाले.

(२) शेती क्षेत्र

शेती क्षेत्रात एकाचवेळी उत्पादन करणे आणि थांबविणे कठिण असल्यामुळे शेतमाल विक्रीच्या प्रक्रियेत बरेच अडथळे निर्माण झाले. कोविडमुळे रब्बी पिके विकण्याची प्रक्रिया कोलमडली तर खरीप पिकांचे बि–बियाणे खरेदीवर बऱ्याच मर्यादा आलेल्या आहे. ८० हजार रूपयाचे उत्पादन होण्याऐवजी किंमत पडल्यामुळे ४०,००० रूपये किंमतीचे उत्पादन झाले. याचवेळी ग्रामीण परिसरात कोवीडच्या खोट्या व भ्रामक युक्त्या निर्माण झालेल्या पहायला मिळतात. उदा. मटन किंवा चिकन खाल्यामुळे कोरोना होतो त्यामुळे शेतीपूरक व्यवसाय व मजुरांवर उपासमारीचे संकट कोसळले. भारतीय शेती निसर्गावर आधारित असल्यामुळे जुन–जुलै–२०२० पासून हंगामाला सुरवात करणे आवश्यक होते. शेतकऱ्यांनी शेतीला सुरवात केली परंतु खते–बीयाणे यांच्या किंमती मोठ्या व पुढे माल विकतांना येणाऱ्या अडचणी, (लॉकडाऊनमुळे) त्यामुळे उत्पादन खर्च व उत्पादन यात पर्यावरण अनुकूलता चांगली मिळाली असतांना शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे, परंतु एक महत्वाची गोष्ट अशी की उद्योग व सेवा क्षेत्र ठप्प पडले असतांना शेती क्षेत्राचे कार्य अडथळ्यासह सुरू असल्यामुळे शेतकऱ्यांचे मानसिक संतुलन बिघडले नाही त्याचा फायदाही पुढे अर्थव्यवस्थेला अल्प प्रमाणात मिळाला आहे.

(३) सेवा क्षेत्र

वर्तमान दशकाच्या सुरवातीपासुन (२०१०–२०२०) आर्थिक अस्थिरता देशात कायम असल्यामुळे कोवीड मुळे पुन्हा अस्थिरतेत भर पडलेली दिसते. आर्थिक प्रवाह उत्तेजीत करण्यासाठी व्याज दर कमी करणे हा उपाय वापरून सुध्दा निराशमय वातावरणामुळे प्रवाह संतुलित झालेला नाही. ठेवी जास्त व मागणी कमी असा बिघाड संबंध जुळला असल्यामुळे विपरित परिणाम मोठा झाला. भविष्यकालिन निश्चितता अधिक अनिश्चित बनत जात असल्यामुळे सेवा क्षेत्रावर मर्यादा निर्माण होत असलेल्या पहायला मिळते.

(४) पर्यावरण समृध्दता

कोवीड–१९ चा प्रतिकूल परिणाम मोठा झाला असला तरी पर्यावरणावर प्रचंड अनुकुल परिणाम झाला आहे. लोकांचे दैनंदिन आरोग्य यामुळे काही अंशी सुदृढझालेले आहे. कोरोनाच्या भीतीमुळे लोकांनी आपल्या आरोग्याकडे लक्ष दिले, जीवनशैलीत थोडा बदल केला आणि पर्यावरण सुदृढतेमुळे त्याचा एकंदर फायदा तयार झाला. अनेक प्रतिकुलता काही अनुकुलता तयार करतात याची प्रचिती कोरोना व पर्यावरणात पहायला मिळाली कोरोना पर्यावरणाचे रक्षण करणारे साधन ठरले आहे. परंतु प्रचंड भीतीमुळे त्याचा फायदा उचलता आला नाही आणि अनलॉकडाऊनमुळे पर्यावरणाची संतुलनता पुन्हा बिघडत चाललेली दिसून येते.



Scanned with OKEN Scanner

वर्तमान दशकातील जी.एस.टी. चा प्रयोग आणि आर्थिक स्थित्यंतर

राजकोषीय धोरणातील एक देश – एक कर हे नाते सुदृढ करण्यासाठी शासनाने १ जुलै २०१७ पासून अनेक अप्रत्यक्ष कराऐवजी एकच अप्रत्यक्ष कर निर्माण करण्यात आला आहे. तो म्हणजे वस्तू आणि सेवा कर होय. कर हे अप्रिय असले तरी त्यातील तिव्रता कमी असणे आवश्यक आहे. या हेतूने जी.एस.टी. ची सुरवात झाली आहे. अंमलबजावणी होत आहे. एक देश – एक करप्रणाली हे समीकरण योग्य असले तरी करदेयक्षमता ही प्रत्येक करदात्यांची वेगवेगळी असते याचा अधिक विचार जी.एस.टी मध्ये होणे आवश्यक आहे. सर्वसामान्य व्यक्ती अतिचैनिच्या वस्तू म्हणजे २८% करश्रेणीत येणाऱ्या वस्तू खरेदी करीत नसल्या तरी बाकी करश्रेणीतील वस्तू त्याला खरेदी करणे भाग पडत जात असतांना सर्वसामान्य व्यक्तीच्या करदेयक्षमतेवर मर्यादा निर्माण झाल्या आहे. पुरोगामीत्वाचे प्रतिनिधीत्व जी.एस.टीत होत असले तरी प्रमाणबध्दता अधिकच आहे त्याचा फायदा गरिबांना होण्याऐवजी श्रीमंताना होतांना दिसून येतो. वाढलेल्या कराचा भार गरिब उपभोक्त्यांना प्रत्येकवेळी सहन करावा लागत आहे.

दर महिण्याला वाढणाऱ्या वस्तूंच्या किंमती व जी.एस.टीमुळे त्यात पडणारी भर व वाढणारे उत्पन्न यात ताळमेळ सर्वसामान्य व्यक्तीला बसविणे कठिण होत आहे, त्यामुळे जी.एस.टी मधील करश्रेणीत बदल होणे अपेक्षित आहे. जी.एस. टी पुर्वीचे वातावरण बिघडलेले होते, त्यात काही प्रमाणात सुधारणा झाली असली तरी सर्वसामान्य व्यक्तीच्या उत्पन्नाचा विचार होणे यात आवश्यक आहे. ०%, ०५%,१२%,१८% व २८% या जी.एस.टी मधील प्रमुख पाच करश्रेण्या आहेत. यातील अंतिम करश्रेणी चा फायदा सर्वासामान्यांना होत नाही त्यामुळे ५%,१२% आणि १८% या प्रमुख तीन करश्रेणीत अनुकूल बदल करणे अतिआवश्यक आहे. नोटाबंदीने आर्थिक अस्थिरता निर्माण केली आणि जी.एस.टीमुळे ती अस्थिरता दुरस्त करण्याचा प्रयत्न सुरू असतांना सर्वसामान्य ग्राहकावर कराचा मोठा बोझा पडत जात आहे. आणि यामुळे शासनाचे सामाजिक कल्याणाचे उद्दिष्ट्य संकोचीत झाले आहे.

**नोटाबंदी आणि वर्तमान दशकातील आर्थिक स्थित्यंतरण**

वर्तमान दशकता "चोर सोडून सन्यासाला शिक्षा" अशाच प्रकारची अंमलबजावणी शासनाच्या योजनांमध्ये पहायला मिळते आहे. नोटाबंदी चा प्रयोग सुध्दा यासाठी अपवाद नाही. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी नोटाबंदीचा निर्णय झाला व भष्ट्राचाराच्या सर्व वाटा बंद पडल्या अशी सामान्य व्यक्तीची समज झाली असतांना भष्ट्राचाराचे नवीन स्वरूप तयार झालेले दिसून येते. उदा. १००० रूपयाच्या नोटाऐवजी २००० रूपयाच्या नोटा आणि चलनप्रवेगाची गती वाढणे.

काळा पैसा, आर्थिक अस्थिरता, भष्ट्राचार हे प्रश्न नोटाबंदीमुळे सोडविणे शक्य असले तरी प्रथमता केंद्रिय बॅकेच्या हातात असणाऱ्या सर्व साधनांचा क्रमवार वापर होणे अपेक्षित आहे. सर्व साधनांचा क्रमवार वापर झाला असतांना अस्थिरता कायम असल्यास नोटाबंदीसारख्या प्रयोग यशस्वी ठरू शकतो परंतु शेवटच्या साधनाचा पहिला वापर झाल्यास त्याचे फायदे दिर्घकाळात तयार होईल परंतु वर्तमान पिढीला त्याचे मोठे नुकसान सहन करावे लागते ही चुकी नोटाबंदीत झालेली पहायला मिळते. नोटाबंदी वर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भष्ट्राचार, काळापैसा, अस्थिरता ह्या नैसर्गिक घटना नाही तर कुत्रीम घटना आहे. त्यामुळे शासन कृतीची संरचना दुरूस्त होणे आवश्यक आहे. शासन मोजक्या लोकांच्या कल्याणाकरीता सामाजिक कल्याणात बिघाड आणतांना दिसत आहे.

शासनाने नोटाबंदीऐवजी कॅशलेस प्रणालीवर प्रचंड लक्ष दिले गेले असल्यास आर्थिक स्थिरतेचा पाया आपल्या अर्थव्यवस्थेत प्रचंड वाढला असता. परंतु नोटाबंदी व कॅशलेस असे समीकरण जोडले गेले असल्यामुळे पाहिजे त्या प्रमाणात कॅशलेस व्यवहार वाढलेले नाही. त्याला वित्तीय साक्षरतेचा अभावही मोठा जबाबदार आहे. वित्तीय साक्षरता प्रणाली मोठी विकसीत करून कॅशलेस व्यवहार प्रणाली अधिक विस्तारीत केल्यास नोटाबंदीसारख्या मोठ्या प्रयोगाऐवजी साध्या प्रयोगाने सुध्दा आर्थिक अस्थिरता नष्ट होऊ शकते. नोटाबंदीने आर्थिक अस्थिरता निर्माण केली व जी.एस.टी मुळे त्यात दुरस्तीकरण सुरू आहे व कॅशलेस व्यवहारामार्फत सुध्दा आर्थिक अस्थिरता कमी करण्याचा प्रयोग सुरू असतांना वित्तीय साक्षरतेत वाढकरणे आवश्यक आहे. डिजीटललाईझेन हे मुख्यता शहरी आणि साक्षर असणाऱ्यासाठी नाही तर अर्धसाक्षर व निमशहरी व ग्रामीण जनतेला फायदेशीर ठरणार यांच्या युक्त्या तयार होणे अपेक्षित आहे.

**थिंक टॅक (नीती आयोग) आणि वर्तमान दशकातील आर्थिक स्थित्यंतर**



Scanned with OKEN Scanner

भारतीय अर्थव्यवस्थेच्या इतिहासात नियोजन आयोगाचा इतिहास विशेष महत्वाचा आहे. अनेक नियोजनाचे खाजगी प्रयत्न उदा. भारतासाठी नियोजीत अर्थव्यवस्था, मुंबई योजना, गांधी योजना, सर्वोदय योजना, जनता योजना इत्यादी अपयशी ठरल्यानंतर पुढे त्याच अपयशातून नियोजन आयोगाची स्थापना १५ मार्च १९५० रोजी झाली आहे. १२ व्या पंचवार्षिक (२०१२–२०१७) योजनेची अंमलबाजवणी सुरू असतांना राज्याचा सहभाग नियोजनात वाढण्याकरीता नियोजन आयोग बरखास्त करून नीति आयोगाची स्थापना १ जाने २०१५ रोजी करण्यात आली आहे व आज पाच वर्ष पूर्ण झालेली आहे. ही खुप मोठी उपलब्धी वर्तमान सरकारने वर्तमान दशकात तयार केली आहे.

प्रेरित किंवा उत्तेजीत नियोजनात नीती आयोगाचे फार महत्वाचे स्थाने आहे. प्रत्येक राज्यात बऱ्याच समानता असल्यातरी विभिन्नताही खुप मोठ्या उपस्थित आहे. प्रत्येक घटक व केंद्रशासीत प्रदेशातील स्थानिक प्रश्नही वेगवेगळे असल्यामुळे नीती आयोगासारखा विचार गट आवश्यक होता. नीती आयोगामुळे नियोजनात केंद्रित व्यापकता आली आहे. अर्थव्यवस्थेचा कणा मजबुत करणाऱ्या अनेक संस्थापैकी नीती आयोग महत्वाची संस्था असल्यामुळे तीचे महत्व वर्तमान दशकात व पुढेही मोठे राहणार आहे. विचार गटानी विकेंद्रिकरणाला चालना देऊन शेती, उद्योक, सेवा, आयात–निर्यात, आत्मनिर्भरता, स्थानिक व प्रादेशिक अस्मिता यांना अधिक महत्वाकांक्षी बनविणे आवश्यक आहे. २०११ च्या जनगणनेतून कार्यकारी लोकसंख्येचा मोठा आकडा देशात उपलब्ध आहे आणि नैसर्गिक साधनासंपत्तीबाबत बरीच विपुलता आणि विभिन्नता देशात असल्यामुळे प्रत्येक राज्यातील समस्यांचा प्राध्यान्यक्रम लक्षात घेऊन नियोजनाची आखणी केल्यास, अंमलबजावणीत कोणतेही अडथळे निर्माण होणार नाही आणि यातुनच विकासाचा प्रवाह शाश्वत व सर्वसमावेशक निर्माण होईल यात शंका नाही.

**निष्कर्ष**

(१) भारताला वर्तमान दशकामध्ये (२०१०–२०२०) कार्यकारी लोकसंख्येचा मोठा आकडा (७२.३८%) २०११ च्या जनगणनेतुन मिळाला आहे.

(२) वर्तमान दशकात भष्ट्राचार, काळा पैसा, आर्थिक अस्थिरता नष्ट करण्यासाठी नोटाबंदी ऐवजी कॅशलेस प्रणालीचा स्वतंत्र विस्तार कार्यक्रम राबविणे अपेक्षित असलेले दिसून येते.

(३) वर्तमान दशकात बहूमत सरकारकडे असल्यामूळे किंवा विरोधी पक्ष दुर्बल असल्यामुळे आर्थिक अस्थिरता कायम असलेली दिसून येते.

(४) भारतीय अर्थव्यवस्थेत स्वच्छ भारत अभियान आणि नीयोजन आयोगाऐवजी नीती आयोगाची झालेली स्थापना ह्या वर्तमान दशकातील खुप मोठ्या उपलब्धी ठरल्या आहे.

(५) वर्तमान दशकामध्ये लोकशाहीच्या मजबुतीकरणाला संधी मिळाली असतांना त्याचा वापर खुप मोठा झालेला दिसून येत नाही.

**(६) भारतीय अर्थव्यवस्थेत वर्तमान दशकामध्ये कोवीड–१९ चे संकट फार मोठे अस्थिरता निर्माण करणारे ठरलेले दिसून येते.**

(७) सरकारने उत्तेजन पॅकेज आणि लोकांनी सॉनिटायझर, हॅन्डवॉश, मास्क, सुरक्षित अंतर वापरून एकमेकांना सहकार्य केल्यामुळे कोवीडचा विस्तार राखण्यास मदत झालेली दिसून येते.

(८) वर्तमान दशक आव्हानांनी युक्त असले तरी बऱ्याच संधी या दशकात व पुढिल दशकासाठी उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

(९) अ–जागतिकीकरणाचे प्रेरक तत्व म्हणून वर्तमान दशकांची स्वंतत्रओळख निर्माण झालेली दिसून येते.

**गृहितकृत्याची पडताळणी**

कोवीड–१९ ची लागण थांबविण्याकरीता यावर इतर काही उपाययोजना बरोबर टाळेबंदीवर फार मोठ्या प्रमाणावर भर दिल्यामुळे त्याचा परिणाम असा झाला की, सर्व आर्थिक उपक्रम व व्यवहारअचानक बंद झाले आणि देशाच्या आर्थिक वृध्दीवर मोठा प्रतिकूल परिणाम झाला. संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालाप्रमाणे भारत हा जगातील प्रतिकूल परिणाम झालेला १५ वा देश आहे. India Rating and Research च्या मते, २०२०–२०२१ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा GDP वृध्दीदर – ५.३% राहील आणि तो गेल्या चाळीस वर्षातील सर्वात कमी असेल.



Scanned with OKEN Scanner

हे सर्व विश्लेषण सिध्द करते की कोवीड–१९ चा प्रसार नियंत्रीत करण्यासाठी खात्रीचा उपाय म्हणून लागू केलेल्या टाळेबंदीचा भारताच्या आर्थिक वृध्दीवर किंवा विकासावर अत्यंत प्रतिकूल परिणाम झाला आहे. एकूणच २०२०–२०२१ हे आर्थिक वर्ष कोवीडमुळे विकासावर अत्यंत प्रतिकुल परिणाम करणारे ठरले आहे हे गृहितक सत्य ठरले आहे.

**सुचना आणि शिफारशी**

१. अर्थव्यवस्थेच्या सर्वसमावेशक विकासासाठी आत्मनिर्भर भारत या संकल्पनेचे सार्वत्रिकरण करणे आवश्यक आहे.

२. जागतिकीकरणाच्या मर्यादा लक्षात घेवून अजागतिकीकरण्याची व्याप्ती वाढविणे आवश्यक आहे.

३. स्वच्छ भारत अभियानाची वाढलेली व्याप्ती कायम ठेवणे अतिआवश्यक आहे.

४. वस्तू व सेवा करप्रणालीतील अंतिम कराची मर्यादा २८%तसेच १२% आणि १८% हया करश्रेण्यामध्ये सुधारणा करून वस्तूच्या दर्जाकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

५. भारतात राजनिती, प्रशासन, धर्म, व्यवसाय, विज्ञानासहित सर्व क्षेत्रात रचनात्मक नेतृत्वाच्या विकासात भर घालणे आवश्यक आहे.

६. शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्र अर्थव्यवस्थेचे मुख्य खांब असल्यामुळे आर्थिक स्थिरतेसाठी त्यात संतुलन टिकविणे आवश्यक आहे.

७. भारतीय अर्थव्यवस्थेत विकासाचे अंतिम स्त्रोत उपलब्ध असल्यामुळे शास्त्रज्ञानाचा वापर प्रत्येकाकडून वाढणे अपेक्षित आहे.

८. तन–मन–धन से सदा सुखी हो भारत देश हमारा विश्व हमारा हे घोषवाक्य सर्व राष्ट्रांनी अंमलात आणल्यास विकासाचा प्रवाह पिढ्यानपिढ्या तयार होईल.

९. भारतीय अर्थव्यवस्थेतेतील संस्कृती व परंपरा "विश्व हे कुटूंब आहे" अशी शिकवण देते.याचा सर्व जगात विकासासाठी विस्तार होणे आवश्यक आहे.

**समारोप**

अर्थव्यवस्थेतील वर्तमान दशकामध्ये अनेक प्रतिकुल व मोजक्या अनुकुल घटना घडलेल्या पहायला मिळतात. कोवीड–१९ हे मोठे नैसर्गिक संकट ठरले आहे आणि कायमची उपाययोजना करण्यासाठी बराच वेळ लागत असल्यामुळे आर्थिक, सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक असे सर्वच लोकजिवन बिघडले आहे. अस्थिरता किंवा संकट हे कायम नसते त्यामुळे उपाययोजना होत आहे, त्यातुनच नवीन संधी आणि आव्हाने स्वावलंबनासाठी किंवा आत्मनिर्भरतेसाठी तयार होईल. पुढे अजागतिकरणाच्या माध्यामातुन जनता व शासन सहकार्याने तसेच प्रत्येकांच्या शास्त्रज्ञानाने आर्थिक अस्थिरता व इतर अस्थिरता कमी वेळात नष्ट करता येईल अशा क्षमतांच्या विकासासाठी वर्तमान दशक दिपस्तंभासारखे ठरले आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :–**

(१) देशपांडे विनायक,भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास), हिमालया पब्लिशींग, नागपूर, २०१०
(२) गाडगीळ गंगाधर,नियोजन आणि समृध्दी, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९६१
(३) पाटील जे. एफ, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी पर्यायी दृष्टीकोण, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, २०१२
(४) गोवीलकर विनायक, अर्थजिज्ञासा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे,२०१९
(५) पंडित नलिनी, जागतिकीकरण आणि भारत, लोकवाङ्मयगृह, मुंबई, २००१
(६) Government of India, Economic Survey Reports, New Delhi,2019
(७) Borkar, V. V., Income Tax Reform in India, Popular Parkashan, Bombay,2019



Scanned with OKEN Scanner